# " ज्ञानाची शेती "

# विषमुक्त (Residue Free) खरबूज लागवड तंत्रज्ञान

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

खरबूज हे एकवेल वर्गीय, फळ पिक असून त्याची लागवड आपलेकडे पूर्वीचे काळी उन्हाळ्यात नदीपात्रात केली जात असे. एकूण उत्पादनाचे प्रमाणात महाराष्ट्रात या पिकाची लागवड अगदीच कमी क्षेत्रावर केली जाते. उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, पंजाब, मध्य प्रदेश, हरियाणा, तामिळनाडू, कर्नाटक, बिहार इ. राज्यांमध्ये या पिकाची फार मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. परंतू या पिकाचे लागवडीसाठी आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये लागवड केल्यास तो माल उत्तरेच्या बाजारात जाने-फेब्रुवारी मध्ये पाठवता येतो त्यावेळेस उत्तरेतील थंडी कमी होऊन उन्हाळा नुकताच सुरू झालेला असतो त्यामुळे चांगला बाजारभाव मिळतो. कारण त्यांचेकडील लागवडी त्यावेळेस सुरू झालेल्या असतात. त्यामुळे या पिकातील आगाप लागवडीसाठी फार मोठा वाव आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना आहे. परंतू या हंगामात पिक तयार होण्यास 10-15 दिवस जास्त होते तसेच किड व रोगांचा प्रार्दूभाव जास्त होतो, पर्यायाने उत्पादने खर्च जास्त होतो तसेच उत्पादनही कमी मिळते.

या पिकाचा उन्हाळ्यात फार मोठ्या प्रमाणात ग्राहकांची मागणी असते. शरीराची पाण्याची व साखरेची गरज भागवण्यासाठी हे एक उपयुक्त फळपिक आहे. यातून चुना, फॉस्फरस, खनिजे व जिवनसत्व "अ", "ब" व "क" काही प्रमाणात मिळतात. खरबूजाचे सरबत, ज्यूस चविष्ट, थंडगार असते, तसेच हे फळ मधूर व स्वादिष्ट असते. त्यामुळे या फळास फार मोठ्या प्रमाणात मागणी असते. आपलेकडील हवामानात जमिनीमध्ये या पिकांचे लागवडीस खूप मोठा वाव आहे. तसेच हे फळ कच्चा स्वरूपात सेवन केले जात असल्याने या पिकाचे विषमुक्त (Residue Free) उत्पादन घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी आपण आज विषमुक्त खरबूज शेती मधील प्रगत तंत्रज्ञान समजून घेणार आहोत.



**हवामान :-** या पिकास मुख्यत्वे उष्ण व कोरडे हवामान मानवते. भरपूर सूर्य प्रकाश आवश्यक असतो या पिकाचे वाढ काळात दमटपणा व धुके असल्यास वेलीची वाढ व्यवस्थित होत नाही पिक रोगांस बळी पडते व उत्पादन खर्चात वाढ होते.

उत्तम वाढीसाठी $24^0$C ते $27^0$C तापमान आवश्यक. तापमान २१$^0$C पेक्षा कमी असेल तर बियाणे उगवत नाही. तापमान $18^0$C पेक्षा कमी व $32^0$C चे वर असल्यास वेलीचे वाढीवर व फळधारणेनंतर विपरित परिणाम होतो. तापमानातील चढ उतार या पिकाचे वाढीत विपरित परिणाम होतो.

**जमिन :-** या पिकास मध्यम काळी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमिन खरिप हंगामातील व नोव्हेंबर – डिसेंबर चे लागवडीसाठी निवडावी. हे पिक नैसर्गिकरित्या हलक्या, पोयट्याचे, वाळूकामय जमिनीतील असून या जमिनीमधील फळांचा दर्जा उत्तम असतो. उन्हाळी हंगामात लागवडीसाठी मध्यम ते काळी

कसदार गाळाची, सुपीक जमिन, उत्तम निचऱ्याची जमिन निवडावी. त्यामध्ये उच्च उत्पादन मिळते. चुनखडीयुक्त, खारवट, चोपण जमिनीत या पिकाची लागवड करू नये. लागवडीसाठी निवडलेल्या जमिनीचा सामू हा 5.5 ते 7 एवढा असावा.

**जमिनीची मशागत व रानबांधणी :-** उन्हाळी हंगामात जमिनीची चांगली नांगरट करावी. नांगरट ही डिसेंबर, जानेवारी मध्ये (हिवाळी) करावी त्यावेळी जमिनीत ओलावा असतो. उन्हाळ्यात नांगरट केल्यास जमिन पूर्णपणे कोरडी असते, खूप ढेकळे निघतात. नंतर २/३ कुळवाचे पाळ्या देऊन जमिन भुसभशीत करून उन्हाळा तापू द्यावा. ज्यामुळे हानीकारक किडींचे कोष, बुरशीचा नायनाट होऊन जमिनीस विश्रांती मिळेल.

बिगर हंगामी लागवडीसाठी म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये लागवड करावयाची असेल तर खरिपामध्ये मूग, उडीद, कांदा पिक काढणीनंतर जमिन तयार करावी. मशागत करताना ओल्या वाफसा नसलेल्या जमिनीत मशागत करू नये. जमिन चांगली कोरडी झालेवर मशागत करावी. जेणेकरून खूप ढेकळे निघणार नाहीत तसेच पूर्वीचे पिकांचे अवशेष पण कुजून जातील व ऑक्टोबर हिट मध्ये जमिन चांगली तापेल व हानीकारक बुरशी, किडींचे कोष नष्ट होतील. लागवडीपूर्वी शेतात बेसल डोस व शेणखत समप्रमाणात मिसळून बेड तयार करावेत.

खरबूज पिकाची लागवड ही 5-6 फूट X 1.25 फूट अंतरावर करावयाची असल्याने या पिकाचे बेड 2.5 फूट रूंद व 15 सेमी उंचीचे तयार करावे. त्यावर इनलाईन लॅटरल मधोमध अंथरून घ्यावे व 4 फूट रूंदीचा प्लॅस्टीक मल्चिंग पेपर टाकावा. मल्चिंग पेपरचे बेडचे बाजूस / खाली आलेला संपूर्ण भाग / मातीने बुजवून घ्यावा. मल्चिंग पेपरमध्ये हवेच्या पोकळ्या राहणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यानंतर तो 4/8 दिवस तसाच ठेवून जमिन तापू द्यावी.



**खरबूजाचे पिकाचे प्रचलित वाण :-**

खरबूज पिकाचे बाजारामध्ये भरपूर वाण उपलब्ध आहेत. उत्पादनक्षमता, लागवडीसाठी निवडलेला हंगाम, कोणत्या बाजारासाठी फळ विक्री करावयाची आहे, आपला स्वत:चा अनुभव, ईतर शेतकऱ्यांचे अनुभव, बियाणे उत्पादक व विक्री करणारे प्रतिनिधी, उत्पादकाचे अधिकृत वेबसाईट वरील माहिती इ. चा विचार करून वाणाची निवड करावी. किड रोगास सहनशील, प्रतिकारक्षम, बळी पडणारा खाली काही शेतकऱ्यांमध्ये प्रचलित असलेल्या वाणाबाबत माहिती दिलेली आहे.

1) **कोहिनुर (नोयुसिड्स) :-** उच्च उत्पादनक्षमता, परंतू हिवाळ्यात जास्त जोखीम असते. उत्तरेकडील राज्यातून खूप मागणी, व्यापारी बुकींग घेतात. फळास जाडी कमी असते. उत्पादन 20 टन, दर चांगले मिळतात. टिकवणक्षमता व दूरचे वाहतूकीसाठी चांगला आहे.
2) **बॉबी (नोयुसिड्स) :-** सिंगलजाळी असते, बाजारात चांगली मागणी, जास्त जोखीम नसते, गर पांढरा शुभ्र, साठवणक्षमता चांगली आहे, निर्यातक्षम वाण. उत्पादन 20 टन मिळते.
3) **कुंदन (नोयुसिड्स) :-** खूप जुना वाण, तरी सुध्दा खूप शेतकरी ह्याची निवड करतात. फळावर जाळी असते. उत्पादन 16-17 टन एकरी, यास दर कमी मिळतो. दूरचे वाहतूकीमध्ये व साठवणूकीत टिकत नाही, रोगास सहनशिल.
4) **लॉयलपूर – 257 (BASF) :-** याचा फळाचा आकार अंडाकृती रंग पांढरा बाहेरून, आतून गडद पिवळा गर, 60-65 दिवसात तयार होतो. फळाचे वजन सरासरी 1 ते 1.5 किलो, साखरेचे प्रमाण – 12-16% खाण्यास गोड, कुरकुरीत.
5) **विजय (सागर सिड्स) :-** जाळीदार फळ, गर गडद पिवळा, अंडाकृती फळ, 1.5 – 2 किलो वजनाचे, एकसारखी फळे मिळतात. साखरेचे प्रमाण 13-14% साठवणूक व लांबचे वाहतूकीसाठी चांगला 60-65 दिवसात पूर्नलागवडीनंतर तयार होतो.
6) **गुरू (ॲडव्हांटा) :-** उच्च उत्पादनक्षम, 20 टन सरासरी उत्पादन, साठवणक्षमता व लांबचे वाहतूकीसाठी चांगला, डबल नेट असते. गर गडद पिवळा, गोल आकाराचे फळ 60-65 दिवसात तयार होते. केवडा व विषाणू रोगास सहनशिल.
7) **मुस्कान (नोयुसिड्) :-** आकार थोडासा लांबट गराचा रंग फिक्कट हिरवा (Lemon Green) याचा दर जवळपास दुप्पट असतो. फळाचे 1.5 किलो सरासरी वजन, फळ जाळीदार व गोड असते. साखरेचे प्रमाण 14-16% तयार होण्यास 85 दिवस लागतात.

   बियाणाचे प्रमाणे :- 200-250 ग्रॅम बियाणे / एक एकरसाठी आवश्यक असते. एकरी 5 ते 5.5 हजार रोपे लागवडीसाठी वापरावीत.
8) **खुशबु (सिमोंस) :-** वजन 1.2 – 2.5 किलो मिळते, साखरेचे प्रमाण 14-15%, 65-70 दिवसात तयार होते. फळाचा आकार गोल, डबल जाळी असते. गर गडद पिवळा, फ्युझारियम विल्टला सहनशिल.
9) **कस्तुरी, क्रिष्टा, विजय (सागर सिड्स) :-** क्रिमी / पिवळसर फळाचा रंग, नेट असते, गोल ते दंडगोल फळाचा आकार, 1 ते 1.25 किलो फळाचे वजन असते, साखरेचे प्रमाण 13-15% गराचा 65-70 दिवसात तयार होतो.
10) **आयुष (सिंजेंटा) :-** फळ बाहेरील बाजूस पांढरे तर गर गडद पिवळा असतो. फळ जाळीदार असते, साखरेचे प्रमाण 12-16% गोड फळ, मर व केवड्यास (डाऊणीस) प्रतिकारक्षम वाण.

## ❖ रोपवाटिका :-

खरबूज पिकाची लागवड ही प्रथम रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करून ती 18-20 दिवसांची झालेवर प्रत्यक्ष शेतावर लावली जातात. त्यासाठी आपण निवडलेल्या वाणांची रोपवाटिका धारकांस रोपांची आगावू नोंदणी करावी. वेळोवळी रोपवाटिकेस भेट देऊन आपली रोपांची वाढ व काळजी घेतली जात आहे का त्याबाबत खात्री करून घ्यावी. रोपवाटिका ही उच्च गुणवत्तेची निकष पाळत आहे का ? याबाबत माहिती घेवून खात्रीचे, विश्वासू रोपवाटिकेतूनच रोपे आणावीत.

शक्यतो खरबजू पिकाची रोपे रोपवाटिकेत तयार करून घ्यावीत. स्वत: रोपे तयार करण्याचे कौशल्य व त्यासाठी लागणारे ज्ञान व सुविधा यांचा विचार केल्यास स्वत: रोपे तयार करण्याऐवजी रोपवाटिकेतून रोपे विकत घेतल्यास उच्च गुणवत्तेची, सशक्त व निरोगी रोपे किफायतशीर दरामध्ये मिळतात.



## ❖ लागवड :-

बियाणे उत्पादकांनी शिफारस केलेले अंतर, लागवडीचा हंगाम, जमिनीचा पोत यानुसार लागवडीसाठी दोन ओळीतील (बेडमधील) अंतर व दोन रोपांतील अंतर याबाबत शेतकऱ्यांनी निर्णय घ्यावा दोन बेडमध्ये 1 ते 1.5 फुटांचे अंतर ठेवून 4.5 ते 5 फुटाचे बेड तयार करावेत, बेडची उंची ही 1 फूट ठेवावी. रोपवाटिकेमध्ये आपली रोपे कोणत्या तारखेस मिळणार आहेत या दिनांकाचे पूर्वी 8-10 दिवस आपले बेड तयार असावेत. शक्यतो 50 Micron चे प्लॅस्टीक मल्चींगचा वापर खरबूज लागवडीसाठी करावा. मल्चींग टाकण्या अगोदर 16 एमएम चे दोन लॅटरला त्यावर अंथरून घ्याव्यात. ठिबक संच निवडतांना शेताची लांबी, रूंदी याचा विचार करून 16 / 18 एमएम लॅटरची निवड करावी. इनलाईन ड्रीपर व 1-2 लिटर प्रति तास डिस्चार्ज असलेली व 1 फूटावर ड्रीपर असलेले ठिबक निवडाचे. 2 लिटर प्रति तास पेक्षा जास्त डिस्चार्ज असलेले ड्रिपर निवडू नयेत व प्रति बेड 2 लॅटरल वापराव्यात. या पिकास पाणी नियोजन अत्यंत काटेकोरपणे करणे

आवश्यक आहे अन्यथा वापरलेल्या खतांचा तर नाश होणार आहे त्याच बरोबर पिकावर किड व रोगांचा ही प्रार्दूभाव होत असतो.

उन्हाळ्यातील लागवडीसाठी बेड तयार झालेवर लागवडी पूर्वी 8 दिवसापूर्वी संपूर्ण बेड ओलेचिंब करून घ्यावे आहेत. त्यासाठी 8/10 तास ठिबकचा संच चालू ठेवावा त्यानंतर 4 दिवसांनी पुन्हा 4 तास ठिबक संच चालवून पुन्हा पाणी द्यावे यामुळे आपण तयार केलेले बेड हे सेट होतात त्यातील गरम हवा निघून जाते व रोपांची लागवड केले नंतर ची रोपे मर होत नाही. त्यानंतर 2 दिवसांनी प्रत्यक्ष शेतात रोपांची लागवड करावी. रोपे कोकोपिटसह अलगद काढून घेवून त्या आकाराचे अगोदर तयार केलेल्या छिद्रात मुळांना धक्का लागू न देता उन्हाळी हंगामात सायंकाळचे वेळी लावायची आहेत व हिवाळी हंगामात सकाळी लावावीत व त्यावर हलक्या हाताने दाब द्यावा. रोपाचे खोड नाजूक असते, त्यावर दाब पडणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा खोडास ईजा होते व ते रोप नंतर मरते.

बेडवर लागवड झिगझॅग ओळीत, लॅटरलपासून एक फूट अंतरावर प्रत्येकी 1.5 ते 2 फूट झाडामधील अंतर ठेवून करावी.

**पाणी व्यवस्थापन :-**

लागवडीपूर्वी 8/4/2 तास पाणी दर 2 दिवसांनी ठिबकद्वारे देऊन बेड भिजवून घ्यावेत. वाफश्यावर रोपे / बि लागवड करावी व त्याच दिवशी 1 कपभर पाणी कलिंगड पिकाला द्यावे. त्यानंतर रोपाचे गरज, वातावरण, जमिनीचा प्रकार, प्लॅस्टिक मल्चींगमुळे या पिकाची सुरूवातीची पाण्याची गरज खूप कमी असते अशा वेळेस पाणी फार काळजीपूर्वक देणे आवश्यक असते.



वेळ वाढीची व फळ पोसण्याचे अवस्थेत या पिकाची पाण्याची गरज वाढते. शक्यतो दिवसा, ठरलेल्या वेळी म्हणजेच एक निश्चित वेळापत्रक ठरवून पिकास पाणी द्यावे. दररोज / एक दिवसाआड / 2 दिवसाआड, अर्धातास, एकतास, दिडतास असे ठरवून वेळापत्रकाप्रमाणे काटेकोरपणे पाणी द्यावे. पाण्याच्या वेळा, शक्यतो बदलू नये.

ज्यांना कलिंगडाचे पाणी व्यवस्थापन जमले त्यांना हे पिक साधले असे म्हटले जाते. त्यामुळे पिकाची पाण्याची गरज ओळखून जमिन वाफश्यावर कायम राहिल याचा विचार पाणी व्यवस्थापनामध्ये महत्वाचा असतो.



**एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन :-**

खरबूज हे पिक जवळपास 3 महिने शेतात राहत असते व उच्च उत्पादनक्षम पिक असून यासाठी एकरी 10-15 टन शेणखत, 200 किलो निंबोळी पेंड, 10-20 किलो सुक्ष्ममूलद्रव्य ग्रेड 2 व एकरी 3/4 बॅग सिंगलसुपर फॉस्फेट सह 10:26:26, 12:32:16, 20:20:00,:13,24:24:00:8, 18:46 व पोटॅश या पैकी कोणत्याही खताच्या 4 ते 6 बॅग जमिनीवर टाकून त्यानंतर बेड बनवावेत. खरबुज पिकासाठी कृषि विद्यापिठांनी संकरित वाणासाठी हेक्टरी 80 किलो नत्र 40 किलो स्फुरद व 40 किलो पालाश देण्याची शिफारस केलेली आहे. वरिल खतांच्या मात्रेतून त्या मात्रेची पूर्तता करावी. वरिलप्रमाणे लागवडीपूर्वीचा बेसल डोस दिल्यानंतर पाण्यात विरघळणाऱ्या महागड्या खतांचा वापर करण्याची फारशी गरज राहत नाही व पिक वाढीचे अवस्थेनुसार व पिकांचे आवश्यकतेनुसार अन्नद्रव्याचा पुरवठा होत असतो.

**एकात्मिक किड नियंत्रण :-** या पिकामध्ये मुख्यत्वे रोपांची मर, रोपे कोलमडणे, भुरी व केवडा रोगांचा प्रार्दूभाव होतो तर फळमाशी, तांबडे भुंगेरे, रस शोषण करणाऱ्या किडी जसे की, मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी व कोळी या किटकांचा प्रार्दूभाव होतो.

- उन्हाळ्यात शेताची खोल नांगरट करून जमीन तापू द्यावी.
- रुंद वरंबा सरी (बेड) वर लागवड करावी.
- पिकाची फेरपालट करावी.
- पिकांच्या सर्व बाजूंनी मका, झेंडू, मोहरी ई. या सापळा पिकाची लागवड करावी.
- प्रति एकर 20 ते 40 चिकट सापळ्यांचा रस शोषण करणाऱ्या किडींसाठी वापर करावा.
- किड नियंत्रणासाठी प्रथम जैविक बुरशीनाशकांचा, निंबोळी तेल यांचा 5 मिली प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी घ्यावी.

- प्रति एकर 8 ते 10 पक्षी थांबे लावावेत.
- नत्र युक्त खताचा अतिरिक्त वापर करू नये.
- ठिबक व प्लॅस्टिक मल्चींगया सुधारित पध्दतीचा सिंचनासाठी व तणनियंत्रणाासाठी वापर करावा.
- पाणी व्यवस्थापन योग्य रीतीने करावे. पिकात पावसाचे अथवा सिंचनाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- लागवडीचे अंतर, जमिनीचा प्रकार, लागवडीचा हंगाम, वाण यांचा विचार करून एकरी झाडांची संख्या योग्य राखावी. कमी अंतरावर लागवड टाळावी.
- प्रत्येक रोपास पुरेसा सूर्यप्रकाश व खेळती हवा राहील याप्रमाणे लागवड करावी.

खरबूज पीक लागवड करतेवेळी व नंतर हंगामामध्ये 2 वेळा ट्रायकोडर्मा व्हिरीडी, मेटारायझम ॲनोसोप्ली, पॅसिलोमायसिस आणि सुडोमोनास फ्लोरोसन्स या सूक्ष्मजीवांची आळवणी करावी यामुळे पिकावर जमिनीतून येणाऱ्या रोगांवर नियंत्रण राहते तसेच पीक सुदृढ व निरोगी राहते. वरील मित्र बुरशी व जिवाणू एकरी 1 किलो प्रत्येकी याप्रमाणे प्रमाणात आळवणी करण्यात यावी. रासायनिक किटकनाशक तथा बुरशीनाशकाची जमिनीमधून आळवण्या करू नयेत.

मावा, पाने खाणारी अळी व भुंगेऱ्यासाठी व मर, पानावरी ठिपके तांबेरा व केवडा रोगांचे नियंत्रणासाठी ट्रायकोर्डमा व्हिरिडी, बिव्हेरिया बॅसियाना, लेक्यानीसिलिएम लेक्यानी, सुडोमोनास फ्लोरोसन्स, बॅसिलस सबटिलिस प्रत्येकी 5 ग्रॅम / लि. पाण्यासाठी प्रमाण घेवून फवारणी करावी.

शेतकऱ्यांनी महागड्या निविष्ठा वापरावयाचा अट्टहास न करता शेती पध्दतीवर (Practices) भर द्यावा. किड व रोग नियंत्रणासाठी कोणते किडनाशक वापरता त्यापेक्षा, वापरण्याची योग्य वेळ, योग्य किडनाशक, योग्य मात्रेत व योग्य फवारणीचे यंत्राचा वापर करणे महत्वाचे आहे व ते आपल्या हातात आहे. यावर भर देणे गरजेचे आहे.

खरबूज या पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ आणि नोंदणी समिती (CBIRC) यांनी किड व रोग निहाय फारश्या शिफारशी केलेल्या नाहीत. काही कृषी विद्यापीठाच्या शिफारशी व शेतकरी वापरत असलेल्या किडनाशकाची माहिती सोबतच्या तक्त्यात दिलेली आहे. या फवारण्या घेतल्यास कलिंगडावरील कीड व रोगांचा चांगला बंदोबस्त होतो.



**काढणी व उत्पादन :-**

आपण निवडलेला वाण व लागवडीचा हंगाम या नुसार पिक पक्व होण्याचा कालावधी लागत असतो. खरिप व रब्बी हंगामातील पिक काढणीस 70-90 दिवस लागतात तर उन्हाळ्यातील लागवडी 65-70 दिवसात काढणीस येतात. या पिकाची सर्व फळे एकाच वेळी काढण्यास येत नाहीत. पहिल्या टप्यात दिड किलो सरासरी वजनाची फळे जशी तयार होतील तशी काढणी करावी. दूसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील उत्पादन भरपूर असते अशा वेळेस विक्रीसाठी नियोजन पूर्वी पासून करावे.

फळ काढणीस तयार झालेचे ओळखणे तसे अवघड काम आहे त्यासाठी नियमितपणे पाहणी करावी व अनुभवातून शिकावे. मित्रमंडळी व व्यापारी लोकांकडून माहिती घ्यावी. फळ देठापासून अलगद तुटल्यास फळ तयार झाले समजावे, तसेच देठाजवळील बाळी सुकल्यास, फळ दाबल्यास कर्रर्र असा आवाज आल्यास फळ तयार झाले असे समजावे.

वाणाचे गुणधर्म, लागवडीचा हंगाम, हंगामातील वातावरण व शेतकऱ्यांचे व्यवस्थापन कौशल्य यावर उत्पादन अवलंबून असते. सरासरी 15 ते 20 टन खरबूजांचे उत्पादन मिळते.



**यशस्वी खरबूज लागवडीची सुत्रे :-**

- वाणाची निवड करताना कोणत्या बाजारपेठेत माल विक्री करणार आहोत याची माहिती घेवून वाणाची निवड करावी.
- ज्यूस साठी स्थानिक मागणी असलेली वाण वेगळे आहेत, दूरच्या बाजारपेठेत पाठवण्याचे म्हणजेच लांबचे वाहतूकीसाठीचे वाण वेगळे आहेत.
- लागवडीचा कालावधी ठरवताना आपलेकडील हवामान, या फळाची बाजारातील मागणी याचा विचार करावा.
- आगाप लागवडीसाठी म्हणजे नोव्हेंबर – डिसेंबर लागवडीसाठी निवडलेल्या वाणीची साली ची जाडी कमी असलेले, वेलीची कॅनोपी कमी असलेले वाण निवडावेत कारण हे वाण तसेही उन्हाळ्याचे

सुरूवातीस बाजारात जात असतात त्याची टिकवणक्षमता चांगली असते, वाहतूकीसाठी चांगले असतात. या हंगामात जास्त साल जाड असलेली कॅनोपी, जास्त असलेले वाण निवडले तर पिक तयार होण्यास जास्त कालावधी लागतो.

- पिक काढणीस तयार झाले की नाही याबाबत माहिती करून घ्यावी. हे पिक एकाचचवेळी तोडणीस तयार होत नाही. याची काढणी 2-3 टप्यात करावी लागते.
- या पिकांच्या लागवडी एकत्रित गट, ग्रुप करून करावी त्यामुळे नियमितपणे बाजारपेठेत माल पाठवता येतो त्याचवेळेस गटातील शेतकऱ्यांची एकमेकास पिक उत्पादन तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करता येते.
- आगाप लागवडीसाठी शेताची वाफश्यावर मशागत करावी, ओल्या / आंबट ओल्या जमिनीत मशागत करू नका. जमिनीस विश्रांती दिलेल्या ठिकाणी लागवड करावी.
- या पिकानंतर त्याच बेडवर व मल्चींगवर कोणते पिक घेणार आहोत त्याप्रमाणे बेडचे अंतर ठेवावे. उदा. वांगे घ्यावयाचे असेल तर 6-7 फूट, मिरची घ्यावयाचे असेल तर 5-6 फूट.
- मल्चींग पेपर 25-35 मायक्रॉन शक्य झाल्यास 50 मायक्रॉन चा UV स्टॅबीलाईज्ड असावा. मल्चींग पेपरच्या दोन्ही कडा संपूर्ण मातीने झाकुन घ्याव्यात त्यामध्ये हवा राहणार नाही याची काळजी घ्यावी.



- एकरी 5 ते 5.5 हजार रोपांची लागवड करावी, त्यामुळे खर्च कमी होतो. 7 ते 7.5 हजार रोपे लागवडीमुळे रोपांचा, मल्चींग पेपरचा, आळवण्या, फवारणी चा खर्च वाढतो. परंतू उत्पादन वाढत नाही.
- लागवड दक्षिण-उत्तर करावी. लागवडीपूर्वीची सर्व आंतरमशागत पूर्व-पश्चिम करावी शेवटी बेड दक्षिण-उत्तर दिशेने सोडावेत. त्यामुळे सकाळी वेल पूर्वेस वाढतात तर दुपारी ते दक्षिणेस वाढतात. त्यामुळे वेल शक्यतो बेड वर राहतात.
- हिवाळी लागवडीसाठी नवीन क्रॉप कव्हर वापरावे. 20-21 दिवस पिकावर लावावे तर उन्हाळी हंगामासाठी जुने पूर्वीचे क्रॉप कव्हर चालते क्रॉप कव्हर 15-16 दिवस ठेवावे.
- क्रॉप कव्हर लागवडीनंतर 6/7 दिवसांनी टाकावे जेणेकरून रोपांची मर, पाणी व्यवस्थित पडते की नाही हे समजते रोपे सेट झाल्यावर क्रॉप कव्हर टाकावे.
- बेड वर एकच ओळ ड्रिपरचे बाजूस 10 सेमीवर लागवड करावी. "
- ज्या शेतकऱ्याला या पिकाचे पाणी व्यवस्थापन कळले ते या पिकात यशस्वी होतात.
- खरबूज हे पिक अत्यंत नाजूक, जोखमीचे असते, रोगास संवेदनक्षम पिक आहे. त्याची लागवड करायची तर अभ्यास करून माहिती घेवून करावी अन्यथा अपयश ठरलेले आहे.
- सोलापूर, अहिल्यानगर व साताऱ्यातील पूर्वेकडील भाग जो दुष्काळी पट्टा समजला जातो, ज्या ठिकाणी 15 ऑगस्ट पर्यंत खूप कमी पाऊस पडतो, जमिनी हलक्या स्वरूपाच्या, उताराच्या व उत्तम निचऱ्याच्या आहेत त्या ठिकाणी एप्रिल, मे, जुन मध्ये लागवड केली तर ती फळे जुन, जूलै मध्ये विक्रीसाठी तयार होतात. त्यास उत्तर भारतात चांगला बाजारभाव मिळू शकतो. या भागातील शेतकऱ्यांनी हा प्रयोग करून पाहण्यास हरकत नाही.
- मादी फूलांची संख्या वाढवण्यासाठी 100 PPM एनएए 2 फवारण्या पिकाचे 2 पानाची अवस्था व त्यानंतर 1 आठवड्यानी घ्याव्यात.
- प्रत्येक वेलीवर 2-3 फळे ठेवावीत.

## खरबूज या पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ आणि नोंदणीकृत समिती (CIBRC) व व कृषी विद्यापीठ यांनी किड / रोग निहाय, शिफारस केलेली किटकनाशके / बुरशीनाशके

| अ.क्र. | किड/रोगांचे नाव | किडनाशकाचे नाव व गट | उत्पादकांचे नाव व ब्रँड नेम | एकरी शिफारस | PHI |
|---|---|---|---|---|---|
| 1 | फुलकिडे, पांढरी माशी, मावा, नागअळी | सायअँट्रीनिलीप्रोल 10.26% ओडी, | एफएमसी - बेनेव्हिया | 360 | 5 |
| 2 | पांढरी माशी, मावा, नागअळी | डायफेंथुरिऑन 50% WP | सिंजेंटा - पेगासस | 240 | 5 |
| 3 | फळमाशी | मॅलॅथिऑन 5% DP | - | 10 Kg जमिनीवर धुरळावी | - |
| 4 | तांबडे भुंगेरे | मॅलॅथिऑन 50% EC | - | 240 | - |
| 5 | भुरी 48% EC | डिनोकॅप 48% EC | ॲग्रोसिस - कॅराथिन | 300 | - |
| 6 | भुरी 50% WP | कार्बेनडॅझिम 50% WP | क्रिस्टल - बाविस्टिन | 200 | - |
| 7 | केवडा | झायनेब Z - 78 | इंडोफिल- डायथेन Z-78 | 600 | - |
| 8 | मावा, पांढरी माशी, फूलकिडे, मूळावरील अळी इ. | इमिडाक्लोप्रिड 17.8% SL | बायर - कॉन्फीडॉर | 100 | 14 |
| 9 | पानावरील ठिपके, केवडा, भुरी, अँथ्रकनोज | क्लोरोथॅलोनिल 75% WP | टाटा रॅलिज - इशान सिंजेंटा - कवच | 400 | 3 |
| 10 | केवडा | मँडीप्रोमाईड 23.4% SC | सिंजेंटा - रेवस | 160 | 10 |
| 11 | भुरी | ट्रेट्राकोनेझोल 3.8% W/W EW | जिवॲग्रो - डोमार्क | 400 | 12 |
| 12 | मावा, पांढरी माशी, फूलकिडे व ईतर रस शोषण करणाऱ्या किडी. | ॲसिटामाप्रीड 20% SP | टाटा - माणिक | 100-200 | 7 |
| 13 | अळीवर्गीय किडी, पांढरी माशी व ईतर किडी | लॅम्बडा सायहॅलोथ्रीन 5% EC | सिंजेन्टा - कराटे | 100 | 5 |
| 14 | नागअळी, फळमाशी, फूलकिडे आणि ईतर किडी | स्पिनोसॅड 24% EC | कॉरटोव्हा - ट्रेसर | 120 | 7-10 |
| 15 | मावा, पानावरील तुडतुडे, पांढरी माशी | बायफेंथ्रीन 10% EC | धानुका - मार्कर | 200 | 14 |
| 16 | भुरी, केवडा, ॲंथ्रकनोज, पानावरील ठिपके | डायमिथोएट 30% EC | टाटा - रोगर | 200-300 | 7-14 |
| 17 | भुरी, केवडा, अँथ्रकनोज, | मॅन्कोझेब 75% WP | इंडोफिल- डायथेन एम-45 | 500 | 7-14 |
| 18 | भुरी, केवडा, ईतर बुरशीजन्य रोग | ॲझोक्सीस्ट्रॉबिन 23% SC | सिंजेंटा - ॲमिस्टार | 200 | 7 |
| 19 | भुरी, जिवाणूजन्य मर, केवडा | टेब्युकोनॅझोल 38.39 W/W SC | बायर - फॉलीक्युअर | 100-200 | 7 |
| 20 | भूरी, तांबेरा, अँथ्रकनोज | कॉपर हायड्रॉक्साईड | - | 400-800 | 7 |

अनुक्रमे 12 ते 20 क्रमांकावरील किड नाशकांच्या शिफारशी नाहीत परंतू ही किडनाशके शेतकरी वापरत आहेत.